नागपूर मध्यवर्ती कारागृहाची पडलेली भिंत बांधण्याच्या कामास प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,
शासन निर्णय क्र. बीएलडी-३५९३/१(८१)/जेआरएस-२,
दिनांक : ७ सप्टेंबर, १९९३

वाचा:- कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. बीएलडी/नागपूर/१९९२-१९९३-९४/कक्ष-३, दिनांक १०.६.१९९३.

निर्णय:- नागपूर मध्यवर्ती कारागृहाची दक्षिणेकडील मुख्य संरक्षक भिंत दि. ९.६.१९९३ रोजी कोसळली आहे. सदर भिंतीची सुरक्षितेच्या दृष्टीने पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी येणारा अंदाजित खर्च रु. १८,२८,०००/- (रुपये अठरा लाख अठ्ठावीस हजार फक्त) इतक्या खर्चाच्या नकाशास व अंदाजपत्रकास शासन या आदेशाद्वारे प्रशासकीय मान्यता देत आहे.

भिंतीच्या पुनर्बांधणीचे काम निधी उपलब्ध झाल्याशिवाय हाती घेण्यात येऊ नये.

२. यासाठी होणारा खर्च "४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च-०१ कार्यालयीन इमारती १०१ बांधकाम-तुरुंग-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हा आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३०५/इमा-२, दि. १६.७.९३, क्र. १६८/पी-१०, दि. २६.७.९३ व क्र. ४९६/९३/व्यय-८, दि. ६.८.९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

([illegible], शु. साबळे)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे.

कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर.

अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर.

महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.

महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

निवासी लेखा अधिकारी, मुंबई.

सार्वजनिक बांधकाम विभाग, इमारत-२, अर्थ-२.

नियोजन विभाग, योजना-१०.

वित्त विभाग व्यय-८.

गृह विभाग/बोपुडी-१.